BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION
BHIWANDI (Dist. Thane)
MAHARASHTRA
OLD S.T.STAND, KAP-ALI,
BHIWANDI - 421 302, DIST.THANE.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,
भिवंडी, जि.ठाणे
महाराष्ट्र,
जुना एस.टी.स्टॅण्ड,कापआळी,
भिवंडी - ४२१ ३०२, जि.ठाणे.

TEL : 02522-55314/55315, FAX : 02522-52074

जा.क्र./भिनिशमनपा/नगररचना/बा.प्र.क्र.११५/२०१३-२०१४/६९७ दि.३०/६/२०१४

**प्रारंभ प्रमाणपत्र**

प्रति,
श्री. सचिन सी. मिराणी व इतर-१
व्दारा :- आर.के. व असो.
१०१/ए, श्वेता अपा.,कासारआळी,भिवंडी

**विषय :- बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळणेबाबत(इमारत प्रकार-४ व ५)**
**मौजे-भादवड येथील स.नं. ५/१पै व ५/२पै**

**संदर्भ :-१) हया कार्यालयाकडील सुधारीत बांधकाम परवानगी क्र.न.र.वि./३०५३ दि.०१/०२/२०१४**
**२) प्रस्तावाचे इंजिनिअर यांचा दि.१६/०६/२०१४ रोजीचा अर्ज**
**३) आपले दि. १९/०६/२०१४ रोजीचे नोटरीकृत हमीपत्र.**

महोदय,

उपरोक्त विषयांकीत जागेमध्ये आपणांस बांधकाम परवानगी संदर्भ क्र.१ अन्वये मंजूर करणेंत आली आहे. त्या अनुषंगाने आपण संदर्भ क्र. ३ चे हमीपत्र सादर करुन बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र हे संदर्भ क्र.२ मधील अर्जान्वये अपेक्षिले आहे. सबब आपणांस कळविण्यांत येते की आपण **वरील मंजूर परवानगीतील अट क्र. १९ व २३ च्या पूर्ततेस अधिन राहून तसेच खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून इमारतीचे बांधकाम प्रारंभ करण्यास अनुमती देण्यात येत असून त्यानुसार जोत्यापर्यंत बांधकाम पूर्ण करावे** व त्यानंतर जोता तपासणी प्रमाणपत्र मिळणेसाठी विकास नियंत्रण नियमावलीतील अपेंडीक्स "XII" नुसार अर्ज करावा व अपेंडीक्स "XIII" नुसार जोता तपासणी प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतरच जोत्यावरील पुढील बांधकामास सुरुवात करावी.

१. जोत्याचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत अथवा बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राच्या दिनांकापासून एक वर्ष यापैकी जो कमी असेल त्या कालावधीमधे बिनशेती परवानगी प्राप्त न झाल्यास सदरची सवलत संपूष्टात येईल.
२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळाले आहे, जोत्यापर्यंत बांधकाम पूर्ण झाले आहे, व त्यासाठी परवानगीधारकांनी खर्च केला आहे म्हणुन जोत्यावरील बांधकाम बिनशेती परवानगी न मिळाल्यास पूर्व बांधिलकी म्हणुन सुरु करता येणार नाही.
३. जोत्यापर्यंतचे बांधकाम हे परवानगीधारकाने स्वतःच्या जबाबदारीवरच करावयाचे असून बिनशेती परवानगी न मिळाल्यास असे केलेले पायाचे बांधकाम स्वखर्चाने काढुन टाकावयाचे आहे.व बांधकामासाठी केलेल्या खर्चाचे दायित्व महानगरपालिकेवर रहाणार नाही.
४. जमिन बिनशेती करण्याची मुदत जोतातपासणी प्रमाणपत्रापर्यंत वाढवून घेतलेल्या बांधकाम प्रकरणांत प्रकल्पातील नियुक्त आर्किटेक्ट/इंजिनिअर यांची नियुक्ती रद्द करता येणार नाही अथवा आर्किटेक्ट/ इंजिनिअर यांना प्रकल्प सोडता येणार नाही. प्रस्तावित बांधकाम हे मंजूर बांधकाम नियंत्रण नियमावलीनुसार व अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशाच्या मर्यादेमध्ये होईल याची सर्वस्वि जबाबदारी संबधित आर्किटेक्ट/इंजिनिअर यांची राहील.

२/...